# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHAUL BENJAMIN SHINDE

VOL: XXVII YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2026 JANUARY No. 12


### पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

**योएल २:२१-२६**

२१. अगे भूमी, भिऊ नको; उल्लास व हर्ष कर, कारण यहोवाने मोठी कार्ये केली आहेत.

२२. रानातल्या पशूंनो, भिऊ नका, कारण जंगलातील कुरणे फुटू लागली आहेत, आणि झाड आपले फळ देत आहे, अंजीराचे झाड व द्राक्षवेल आपले सत्त्व देत आहेत.

२३. तर सीयोनाच्या संतानांनो, यहोवा तुमचा देव याच्याठायी उल्लास व हर्ष करा, कारण तो तुम्हांला पहिला पाऊस योग्य प्रमाणाने देत आहे, आणि तो तुम्हांसाठी पाऊस, म्हणजे आगोटीचा व वळवाचा पाऊस, पडू देईल.

२४. आणि खळी धान्याने भरून जातील, आणि नव्या द्राक्षारसाने व तेलाने कुंडे भरून काठांवरुन वाहतील.

२५. आणि टोळ, व कुसरूड व घुले व नाकतोडा, हे जे माझे मोठे सैन्य मी तुम्हांमध्ये पाठवले त्याने जी वर्षे खाल्ली आहेत ती मी तुम्हांला परत भरून देईन.

२६. आणि तुम्ही भरपूर खाल व तृप्त व्हाल, आणि यहोवा तुमचा देव ज्याने तुम्हांसाठी आश्चर्यांची कृत्ये केली आहेत त्याचे नाव स्तवाल; आणि माझे लोक कधीही लाजवले जाणार नाहीत.

# या नवीन वर्षात तुम्ही हरवलेले परत मिळवू शकता!

**YOU CAN RECLAIM WHAT YOU LOST IN THIS NEW YEAR!**

*- सिस्टर एंजेल*





तुम्हां सर्वांना २०२६ हे वर्ष आनंदाचे व आशीर्वादाचे जावो!

आपल्या प्रभू आणि तारणहार येशू ख्रिस्ताच्या अद्भुत नावात **इको ऑफ हिज कॉल** मुख्यालयाकडून आपल्याला शुभेच्छा आणि आशीर्वाद.

या नवीन वर्षात प्रवेश करताना आपण स्वाभाविकपणे मागे काय घडले ते पाहतो आणि पुढे काय होणार आहे त्याकडे उत्सुकतेने पाहतो. काही वर्षे युद्धासारखी वाटतात; तर काही वर्षे प्रगती आणि भेदक यशाचे काळ ठरतात. १ इतिहास १८:१ हे वचन आपल्याला आठवण करून देते की, **काळाच्या ओघात** देव दैवी बदल घडवून आणतो; असे क्षण, ज्यामध्ये ज्या विजयांची दीर्घकाळ वाट पाहिली ते शेवटी प्रत्यक्षात प्रकट होतात.

(...पान ३ वर)




**एको ऑफ हिज कॉल**

*यू ट्युब ख्रिश्चन चॅनल !*

**पास्टर सॅम सेल्वा राज यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी**

*पाच मिनिटांचा संदेश*

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे २.०० वाजल्या पासून

रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

✻ कृपा करुन सबक्राईब करा ✻

ECHO OF HIS CALL - (Marching towards 60th year)
Estd. 1969



# तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...

**''....... वर्षाच्या प्रारंभापासून वर्षाच्या शेवटापर्यंतही यहोवा तुझा देव याची नजर नेहमी त्यावर आहे.''**

**- अनुवाद ११:१२**



## आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

HON. EDITOR-IN-CHIEF
Rev. Dr. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.
EX MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
GENERAL MANAGER
Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM, MBA.
ADMINISTRATION
Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)
EDITORIAL BOARD
Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Rev. Dr. William Robert, Ph.D., DD, D.Lit.

EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858
95661 31858
E.MAIL
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.org
YOUTUBE CHANNEL
Echo of His Call

प्रभूमधील प्रिय भावांनो आणि बहिणींनो,

आपला प्रभू आणि तारणहार येशू ख्रिस्ताच्या मौल्यवान नावात आपल्याला हार्दिक शुभेच्छा. आपणास आणि आपल्या परिवारास आशीर्वादमय व प्रगतीशील नवीन वर्षाच्या शुभेच्छा.



*चर्चच्या प्रमुखांची आणि वडिलांची सभा*

मागील वर्षात आपल्यापैकी अनेकांनी कठीण प्रसंग आणि संघर्षांचा सामना केला असेल, आणि देव जणू शांत आहे असेही आपल्याला कधीकधी वाटले असेल. तरीसुद्धा, पवित्र शास्त्रात आपण वाचतो, तसे योसेफला खड्ड्यातून उचलून राजवाड्यात नेण्यात आले. त्याच्या दुखःच्या वेळेस देवाने त्याला लगेचच सांत्वन दिले नाही आणि हे बहुतेकदा आपल्या स्वतःच्या अनुभवांवरून दिसून येते. पण त्याच्या परिपूर्ण वेळेत देव तुम्हाला उंच करील.

**''यास्तव नेमलेल्या वेळी देवाने तुम्हांस उंच करावे म्हणून त्याच्या पराक्रमी हाताखाली नम्र व्हा.''** - १पेत्र ५:६.

प्रभूने हे नवीन वर्ष तुमच्यासाठी नवचैतन्याचे वर्ष ठरवावे, आणि तो तुम्हाला तुमच्यासाठी नव्याने उघडलेल्या मार्गांद्वारे बहुविध आशीर्वादांनी समृद्ध करावे.

**''जी नवी आकाशे व जी नवी पृथ्वी मी निर्माण करीन, ती जशी माझ्यासमोर टिकून राहतील तशी तुमची संतती व तुमचे नाव ही टिकून राहतील.''** - यशया ६६:२२.

या वर्षी आपल्यासमोर अनेक सेवा कार्ये आहेत; अशी कामे जी फक्त मानवी प्रयत्नांनी पूर्ण करणे पूर्णपणे अशक्य आहे. जसे आम्ही तुमची प्रार्थनेत आठवण ठेवतो, तशी तुम्ही सुद्धा तुमच्या प्रार्थनेत आमची आठवण ठेवा. नक्कीच, तुम्ही आशीर्वादित व्हाल.

Our Ministries: ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) YouTube Ministry Online Courses Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners St. Paul's Matriculation School Crusades Community Development

खाली तीन महत्त्वाची तत्त्वे आपण पाळली पाहिजेत:

*१. तुमच्या मंडळीवर आणि तुमच्या पाळकांवर प्रेम करा. सर्व उपासना सभांना नियमितपणे हजेरी लावा. पवित्र शास्त्रानुसार असलेल्या शिक्षणात दृढ रहा.*

*२. तुमच्या जीवनात प्रार्थनेला प्राधान्य द्या आणि सतत देवाच्या सान्निध्यात राहा.*

*३. देवाने त्याच्या कृपेने तुम्हाला दिलेल्या आरोग्य, आर्थिक क्षमता आणि आशीर्वाद यांच्या अनुसार प्रभूची विश्वासयोग्यतेने सेवा करा.*

पुढील दिवसांत तुम्हाला देवाचे संरक्षण, त्याची कृपा, आणि त्याच्या वचनांची पूर्णता अनुभवता यावी, अशी आमची प्रार्थना आहे.

तुम्हां सर्वांवर देवाची कृपा असो!




येशू ख्रिस्तामधील तुमचा सेवक,
**पास्टर एस्. सॅम सेल्व राज,**
E.mail: sam@echoofhiscall.org

(पान १ वरुन...)



*दावीदाने पलिष्ट्यांचा पराभव केला आणि त्यांना आपल्या नियंत्रणात ठेवले.*

दावीदाने पलिष्ट्यांबरोबर अनेक वर्षे संघर्षाचा अनुभव घेतला. तथापि, देवाच्या परिपूर्ण वेळेनुसार सर्व काही बदलले. त्या वचनात एक बदल दिसून येतो, जेव्हा अभिवचनांचा उलगडा होऊ लागला आणि शत्रूंना पराभूत केले गेले.

आपण २०२६ मध्ये पाऊल टाकताना, हा उतारा आपल्याला ग्वाही देतो की, देवाची वेळ ही अचूक असते. आपण पाहू शकत नसतानाही, त्याची योजना सतत पूर्ण होतच असते.

**देव कृती करतो तेव्हा, ती अंतिमच असते!**

**दावीदाने पलिष्ट्यांचा पराभव करून त्यांना कह्यात आणले, आणि गथ व त्याची खेडी पलिष्ट्यांच्या हातातून घेतली**

– (१ इतिहास १८:१).



अनेक वर्षे पलिष्ट्यांनी इस्राएल लोकांची लूट केली. ते वारंवार नुकसान सोसत राहिले; त्यांच्या कुटुंबांचे नुकसान, त्यांची प्रतिष्ठा, कराराचा कोश, आणि अगदी त्यांचा याजक एली. जणू पराभवच त्यांच्या नशिबी आला होता. शत्रू शक्तिशाली दिसत होता, मात्र देव शांत असल्याचे दिसत होता.

पण नंतर तो क्षण आला जेव्हा देवाने हस्तक्षेप केला; आणि जेव्हा देव कृती करतो, तेव्हा त्याचा विजय हा निश्चित असतो.

पवित्र शास्त्र सांगते की, दावीदाने केवळ पलिष्ट्यांचा पराभवच केला असे नाही; तर त्याने त्यांना आपल्याला नियंत्रणात ठेवले, म्हणजे ते पुन्हा कधीही इस्राएलविरुद्ध उभे राहू शकणार नव्हते. पलिष्ट्यांनी वारंवार त्यांच्यावर हल्ले केले होते, पण आता देवाच्या सामर्थ्याने दावीदामार्फत त्यांचा पूर्णतः पराभव झाला.



*आज तुम्ही जे मिस्री पाहत आहात, त्यांना तुम्ही कधीही पहाणार नाही.*

## अत्यंत महत्त्वाची सुचना!




नजीकच्या भविष्यात **एको ऑफ हिज कॉल**च्या पोस्टल डिस्पॅचमध्ये अपरिहार्य व्यत्यय येऊ शकतात. जर आपल्याला कोणताही व्यत्यय न येता **एको ऑफ हिज कॉल** प्राप्त करणे सुरू ठेवायचे असेल तर कृपया आम्हाला आपले नाव, पत्ता, ईमेल आणि व्हॉटस एप नंबर याची माहिती पत्राद्वारे, ईमेल, फोन कॉल किंवा एस एम एस/व्हॉटस एप संदेशाद्वारे तावडतोब पाठवा.

तुमच्या पाठिंब्यामुळे आम्हाला तुमची चांगली सेवा करण्यास मदत होते!

**आमचा पत्ता:**

**एको ऑफ हीज कॉल**
**१०, मोहम्मद अब्दुल्ला २ री गल्ली, चेपॉक, चेन्नई-६००००५, भारत**
**Cell: (+91) 98412 71858 / 98410 71858 E.mail: sam@echoofhiscall.org**

हे देवाने त्याच्या प्रत्येक लेकराल दिलेले अभिवचन आहे: तो तुमच्या लढाईत उतरला की, जे पूर्वी तुमच्याविरुद्ध उठले होते ते पुन्हा कधीही उभे राहणार नाहीत.

"......**आज तुम्ही या मिसऱ्यांना पाहिले त्यांना तुम्ही पुनः कधीही पाहणार नाही.**" (निर्गम १४:१३) – देवाच्या सार्वभौम अधिकाराची आणि त्याच्या लोकांसाठीच्या त्याच्या उद्धाराची एक प्रभावी आठवण.

वर्षानुवर्षे शत्रूने तुमच्यापैकी अनेकांकडून बरेच काही हिरावून घेतले आहे – तुमची शांती, आरोग्य, आर्थिक स्थिती, नातेसंबंध, नोकरी, कुटुंब, बढती, आशीर्वाद. पण प्रभू घोषित करतो: २०२६ हे वर्ष शत्रूने तुमच्याकडून चोरून घेतलेले सर्व परत मिळवण्याचे वर्ष आहे! आमेन!

दावीदाने शत्रूवर मात करून त्यांना पूर्णतः आपल्या नियंत्रणाखाली आणले. तो आता दबला जाणारा नव्हता, तर तो आता विजेता झाला होता. मी प्रार्थना करतो की, या वर्षी तुम्ही शत्रूच्या हल्ल्यांनी प्रभावित होणार नाही, तर येशू ख्रिस्ताच्या अधिकारात चालाल. तुम्ही तुमच्या परिस्थितींवर, प्रसंगांवर, आव्हानांवर आणि गतवर्षांच्या अपयशांवर नियंत्रण मिळवू शकाल, हीच प्रार्थना आहे.

टोळधाडीने जे काही खाऊन टाकले आहे, ते सर्व या वर्षी तुम्ही परत मिळवण्याचे वर्ष आहे.

हे वर्ष फक्त तुमच्याकडील गोष्टी जपण्याचे नाही, तर हरवलेले परत मिळवण्याचे आहे.

## दावीदाने गथ पुन्हा जिंकले – एक विजयाचे प्रतीक!

पलिष्टी लोकांना नमविल्यानंतर दावीदने गथ हे त्यांच्यातील सर्वात मजबूत आणि प्रभावशाली शहर पुन्हा मिळवले. हिब्रूमध्ये, मेथाग अम्मा म्हणजे मातृशहराचा लगाम – नियंत्रण आणि अधिकाराचे आसन. ज्याच्या हाती गथ शहर असे त्याच्या हाती सत्ता असे.

"**गथ हे गल्याथ आणि एकेकाळी इस्राएलला घाबरवणाऱ्या दैत्याचे मूळ गाव होते.**" (१ शमुवेल १७:४; २ शमुवेल २१:१५–२१). तरीही देवाच्या सामर्थ्यापुढे कोणाचाच टिकाव लागू शकला नाही.

जे एकेकाळी पराभवाचे प्रतीक होते ते आता विजयाचे प्रतीक बनले.

त्याचप्रमाणे, ज्या क्षेत्रांत तुम्ही एकेकाळी नुकसान सहन केले होते तीच क्षेत्रे तुमच्या सर्वात मोठ्या विजयाची ठिकाणे बनतील. देव त्याचे वचन पूर्ण करण्यास विश्वासू आहे.

## देवाने दावीदावर कृपा का केली?

दावीद परिपूर्ण नव्हता. तो उतावळा, भावनिक, दोषयुक्त आणि भग्न हृदयाचा होता तरीही देवाने "**तो आपल्या मनासारखा मनुष्य**" असे संबोधले. (१ शमुवेल १३:१४; प्रेषितांची कृत्ये १३:२२).

त्याच्यावर आणि त्याच्या पिढ्यांवर असलेल्या कृपेमागील रहस्य काय होते?

## १. दावीदाने देवाला प्राधान्य दिले!

दावीद नेहमीच देवाला प्राधान्य देत असे. अपयशातही; त्याची पहिली प्रतिक्रिया पश्चात्ताप आणि आत्मसमर्पण होती. तो मोठ्याने ओरडून म्हणाला, "**आपला पवित्र आत्मा माझ्यापासून काढून घेऊ नको.**" (स्तोत्र ५१:११).

त्याने मानवी हाती पडण्यापेक्षा दयाळू देवाच्या हाती पडणे पसंत केले. **त्याने माणसाच्या हातांत पडण्यापेक्षा दयाळू देवाच्या हाती पडणे पसंत केले.** (२ शमुवेल २४:१४). त्याला त्याचा मुकुट,



*तुझा आत्मा माझ्यापासून काढून घेऊ नकोस.*

सिंहासन किंवा प्रतिष्ठेपेक्षा देवाच्या उपस्थितीचे महत्त्व जास्त होते.

शत्रूने ज्याची चोरी केली आहे ते जर आपल्याला परत मिळवायचे असेल, तर आपणही या वर्षाच्या सुरुवातीला देवाला प्राधान्य दिले पाहिजे; जरी त्याचा समय आपण ओळखू शकत नसलो तरी त्याच्यावर आपण विश्वास ठेवला पाहिजे.

आपली प्रार्थना अशी असावी: **हे देवा, तू मला माझे मार्गदर्शन कर आणि मला स्थापित कर; जरी मला कळत नसले तरी, आणि जरी ते माझ्या कल्पनेपलीकडचे असेल तरीही!** (नीतिसूत्रे ३:५–६).

## २. दावीदाचे मन राज्यकेंद्रित होते!

दाविदाला मंदिर बांधण्याची परवानगी नव्हती, तरीही त्याने शलमोनाला लागणाऱ्या सर्व गोष्टी पुरवल्या. त्याने संपत्ती गोळा केली, शांती मिळवली आणि पुढच्या पिढीसाठी पाया रचला.

त्याला स्वतःच्या गौरवापेक्षा देवाच्या गौरवाची अधिक काळजी होती.

आजच्या जगात अनेकजण मान-प्रतिष्ठा, अनुयायी आणि प्रसिद्धीची इच्छा धरतात. परंतु देवाचे खरे सेवक त्याच्या राज्याच्या उन्नतीसाठी शांतपणे काम करीत असतात. देव कोणासही दिसत नसलेले तुमचे परिश्रम पाहतो. प्रतिफळ देणारा तोच आहे.

(...पान ६ वर)

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

ओझी वाहणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

स्तुती आणि प्रार्थनेचे विषय - १९ जानेवारी, २०२६ पासून ते १८ फेब्रुवारी, २०२६

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## याकरीता देवाची स्तुती करा...

**१९ जानेवारी-** आमची मुख्य मंडळी आणि शाखा असलेल्या इतर मंडळ्यांमध्ये अर्थपूर्ण आणि प्रभावी ख्रिसमस व नवीन वर्षाचा उत्सव आयोजित करण्यास देवाने आम्हांस सक्षम केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२० जानेवारी -** आमचे प्रार्थनेतील सहभागीदार, सदस्यता घेणारे सहभागीदार, विश्वासामधील सहभागीदार, जीवनभर सोबत करणारे सहभागीदार, महान सेवाकार्याचे सहभागीदार, आणि त्यांच्या कुटुंबियांवर देवाने त्याचा दयेचा हात ठेवल्याबद्दल देवाची स्तुती करा.

**२१ जानेवारी -** आमच्या **ग्लोबल व्हिजन फॉर द युथ अँड कीड केअर मिनिस्ट्रीला** देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२२ जानेवारी -** ज्या लोकांपर्यंत देवाचा संदेश पोहोचू शकत नाही अशा लोकांपर्यंत ५ मिनिटांच्या संदेशातून तो युट्यूबवरील आमच्या मिनिस्ट्रीच्या माध्यमातून पोहोचविण्यास देव आम्हांस आशीर्वादित करीत असल्याबद्दल देवाची स्तुती करा.

**२३ जानेवारी -** **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूल, नहेम्या बायबल कॉलेजेस** आणि **थिऑलॉजिकल कॉरस्पॉन्डन्स कोर्सेस** यांमधील क्रियाशील गतिविधींबद्दल देवाची स्तुती करा.

**२४ जानेवारी -** आमच्या प्रेसमध्ये छापलेल्या आणि मिशन क्षेत्रात वितरित केलेल्या १६ भाषांमधील प्रकाशनांना देवाने आशीर्वादित केल्याबद्दल देवाची स्तुती करा.

**२५ जानेवारी -** आमचे वरिष्ठ पाळक, बहुआयामी सेवाकार्यांद्वारे शुभवर्तमान घोषित करण्याच्या त्यांच्या अढळ वचनबद्धतेबद्दल देवाची स्तुती करा.

**२६ जानेवारी -** **एको ऑफ हिज कॉलमध्ये** काम करणाऱ्या सर्वांना आणि त्यांच्या कुटुंबियांना देवाने चांगले आरोग्य आणि संरक्षण दिले त्याबद्दल देवाची स्तुती करा.

**२७ जानेवारी -** मंडळीच्या सर्व कार्यात सक्रियपणे सहभागी होण्यासाठी तरुणांना उत्साहितपणाचा आशीर्वाद दिल्याबद्दल देवाची स्तुती करा.

**२८ जानेवारी -** आमच्या सहभागीदारांच्या प्रार्थना आणि आर्थिक पाठिंब्यामुळे आम्हाला देवाने आशीर्वादित केल्याबद्दल देवाची स्तुती करा.

**२९ जानेवारी -** आमच्या सर्व सहाय्यक संपादकांना आणि त्यांच्या कुटुंबियांना आशीर्वादित केल्याबद्दल देवाची स्तुती करा.

**३० जानेवारी -** आमची मुख्य मंडळी आणि त्याच्या शाखीय मंडळ्यांच्या पाळकांना आणि वरिष्ठ वडिलधारकांना देवाने आशीर्वादित केल्याबद्दल देवाची स्तुती करा.

**३१ जानेवारी -** मुख्य मंडळी आणि शाखीय मंडळ्यांमधील कार्यरत असलेल्या आमच्या लहान मुलांमधील सेवाकार्याला देवाने आशीर्वादित केल्याबद्दल देवाची स्तुती करा.

**०१ फेब्रुवारी -** आमचे वरिष्ठ पाळक सेवेसाठी करीत असलेल्या त्यांच्या प्रवासामध्ये देव त्यांना साहाय्य पुरवीत असल्याबद्दल देवाची स्तुती करा.

**०२ फेब्रुवारी -** मुख्य मंडळी तसेच शाखीय मंडळीमधील आमच्या रविवारच्या सभांमध्ये देवाच्या वचनाचे सामर्थ्य प्रकट झाले त्याबद्दल देवाची स्तुती करा.

**०३ फेब्रुवारी -** २०२६ वर्षासाठी आमच्या वरिष्ठ पाळकांना दिलेल्या नवीन दर्शनाबद्दल देवाची स्तुती करा.

## कृपया यासाठी प्रार्थना करा...

**०४ फेब्रुवारी -** इस्राएल, पॅलेस्टाईन, रशिया आणि युक्रेनच्या शांतीसाठी कृपया प्रार्थना करा.

**०५ फेब्रुवारी -** आमचे ज्येष्ठ पाळक रेव्ह. एस. सॅम सेल्व राज आणि त्यांच्या कुटुंबाचे सर्व वाईट शक्तींपासून संरक्षण व्हावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

**०६ फेब्रुवारी -** सर्व ख्रिस्ती संघटना आणि देवाच्या मंडळ्यांवर देवाचा आशीर्वाद आणि त्याचे संरक्षण असावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

**०७ फेब्रुवारी -** आमच्या ऑफिस कर्मचाऱ्यांना आणि प्रिंटिंग कर्मचाऱ्यांना उत्तम आरोग्य लाभावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

**०८ फेब्रुवारी -** जागतिक आर्थिक मंदी समाप्त होण्यासाठी कृपया प्रार्थना करा.

**०९ फेब्रुवारी -** मिशनरी आणि देवाच्या सेवकांविरुद्ध हिंसाचाराचा शेवट होण्यासाठी कृपया प्रार्थना करा.

**१० फेब्रुवारी -** जगभरातील सर्व महिला आणि मुलांच्या सुरक्षिततेसाठी कृपया प्रार्थना करा.

**११ फेब्रुवारी -** **एको ऑफ हिज कॉलचे** युवा आणि लोकांपर्यंत पोहोचून करीत असलेली सेवा यासाठी कृपया प्रार्थना करा.

**१२ फेब्रुवारी -** यावर्षी **एको ऑफ हिज कॉलच्या** सेवेसाठी आवश्यक निधी प्राप्त व्हावा यासाठी कृपया प्रार्थना करा.

**१३ फेब्रुवारी -** सार्वजनिक आणि सरकारी परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी यश आणि दैवी मार्गदर्शन प्राप्त व्हावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

**१४ फेब्रुवारी -** **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूल** आणि **नहेम्या बायबल कॉलेजच्या** विद्यार्थ्यांना देवाचे संरक्षण मिळावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

**१५ फेब्रुवारी -** आजार, गरिबी आणि उपासमारीने त्रस्त असलेल्यांच्या मदतीसाठी कृपया प्रार्थना करा.

**१६ फेब्रुवारी -** मद्यपी आणि दुष्कृत्ये करणाऱ्यांच्या परिवर्तनासाठी कृपया प्रार्थना करा.

**१७ फेब्रुवारी -** या महिन्यातील आपल्या सर्व गरजांसाठी परमेश्वराने तरतूद करावी यासाठी कृपया प्रार्थना करा.

**१८ फेब्रुवारी -** जगभरातील मुलांचे आणि तरुणांचे मोबाईल फोन आणि ऑनलाइन गेमच्या व्यसनापासून संरक्षण व्हावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

(पान ४ वरुन)

जर आपल्याला देवाचे राज्य जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरही यावे असे वाटत असेल, तर आपण देवाच्या राज्याविषयीचे आपले मनोबल वृद्धिंगत करणे अनिवार्य आहे.

त्याचे श्रेय फेसबुकवरील लाईक्सला, इंस्टाग्रामवरील फॉलोअर्सला किंवा युट्युबवरील सबस्क्रायबर्सला मिळते याविषयी नाही. हे येशू ख्रिस्तासाठी अनुयायी किंवा सदस्य गोळा करण्याबद्दल नाही – ते केले जात असलेल्या कामाबद्दल आहे.

२०२६ हे वर्ष आपण स्वतःबद्दल विचार करण्यासाठी नाही तर त्याच्याही पलीकडे जाऊन म्हणजेच देवाच्या राज्याच्या उद्देशासाठी समर्पित असे वर्ष ठरो.

देवाच्या गौरवासाठी **"जे काही करायला तुझ्या हाताला प्राप्त होते ते तू आपल्या पराक्रमाने कर."** (उपदेशक ९:१०).

## ३. दावीदाने सर्व गोष्टींमध्ये देवाला गौरव दिला!

दावीदाने हे कबूल केले की, प्रत्येक विजय देवाकडून मिळाला.

जिंकलेल्या राष्ट्रांकडून मिळालेले सोने, चांदी आणि कांस्य त्याने देवाला अर्पण केले.

**".......ज्या सोन्याच्या ढाली होत्या त्या दावीदाने घेऊन यरुशलेमेस आणल्या...... दावीद राजाने यहोवाला अर्पिली....."** – २शमुवेल ८:७,११.

शत्रूचा एकेकाळचा गौरव असलेली वस्तू त्याने देवाला अर्पण केली आणि तीचा शलमोनाने ओतीव समुद्र, स्तंभ व इतर पवित्र वस्तू तयार करण्यासाठी वापरली.

*म्हणून देवाचे वचन हे जाहीर करते की:*

**"...... दावीद जेथे जेथे जात असे तेथे तेथे यहोवा त्याला जय देत असे"** – २शमुवेल ८:६.

**दावीद जितका देवाचा आदर करीत होता तितकाच देव त्याचा आदर करीत होता. त्याचे शत्रूही त्याला भेटवस्तू देत होते. "आणि दावीदाने हददेजराचे सर्व सैन्य मारले असे हमाथाचा राजा तोई याने ऐकले; तेव्हा तोईने आपला मुलगा मुलगा योराम याला दावीद राजाकडे त्याचे कुशल विचारायला व त्याला आशीर्वाद द्यायला पाठवले, कारण त्याने हददेजराशी लढून त्याला मारले होते. कारण हददेजर तोईशी लढत असे. आणि योरामाने रुप्याची व सोन्याची व पितळेची पात्रे आपल्यावरोबर आणली. तीही दावीद राजाने यहोवाला अर्पिली; जी सर्व राष्ट्रे त्याने जिंकली होती त्यांच्यापासून** (२ शमुवेल ८:९-११). अशाप्रकारे, दावीदाने ते सर्व देवाला अर्पण केले.



*दावीद राजाने प्रभूला सोने, चांदी आणि तांबे अर्पण केले.*

प्रिय बंधू आणि भगिनींनो, या वर्षाच्या सुरुवातीलाच आपण हे निश्चित करूया की, आपल्याला जे काही प्राप्त होत ते देवाकडून होत.

**"प्रत्येक उत्तम दान व प्रत्येक पूर्ण दान वरून आहे;..."** (याकोब १:१७).

देवाने आपल्याला दिलेली सर्वात मोठं दान म्हणजे, त्याचा पुत्र, येशू ख्रिस्त, ज्याला आपण कधीही विसरू नये.

आपण आत्मविश्वासाने उभे राहू शकू म्हणून त्याने आपले दुःख सहन केले.

त्याने आमचे पाप आणि शाप आपल्यावर घेतले आणि आम्हाला आशीर्वादात रूपांतरित केले.

## तुमच्या पुनर्स्थापनाचे आणि विजयाचे वर्ष!

प्रिय जनहो, २०२६ हे फक्त तुमच्याकडे जे आहे ते राखून ठेवण्याचे वर्ष नाही.

शत्रूने जे तुमच्याकडून चोरून घेतले आहे ते त्याच्याकडून परत घेण्याचे हे वर्ष आहे.

जो अधिकार गमावला तो परत मिळवण्याचे, जो आनंद गमावला तो परत मिळवण्याचे आणि जे तुटले होते ते पुन्हा जोडण्याचे हे वर्ष आहे.

**दावीदासारखे जर तुम्ही :**

- देवाला प्राधान्य देता

(पान ९ वर)


नहेम्या बायबल कॉलेजेस

चेपॉक आणि संतोषपुरम, वेलाचेरी, चेन्नाई

शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक

प्रवेशा करिता त्वरा करा ! माध्यम : तमिळ (अर्धवेळ) हिंदी (निवासी) (स्पोन्सरशिप उपलब्ध)

ईश्वरविद्या डिप्लोमा & Bachelor of Theology

संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.

Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858

E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५६ वर्षांपासून मान्यता प्राप्त

* ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे *

## -: आमच्या मुख्यालयातील सेवाकार्या :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रार्थना सेवा | : २४ तास |
| २. | **एको ऑफ हिज कॉल** | : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन |
| ३. | **बायबलकोर** | : मुळभूत बायबल अभ्यासक्रम (इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी) |
| ४. | पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम | : इंग्रजी आणि तामिळ |
| ५. | नहेम्या बायबल कॉलेज | : (चेपॉक, संतोषपुरम आणि वेलाचेरी) |
| ६. | शाखा चर्च | : संतोषपुरम, बालाजी नगर आणि वेलाचेरी |
| ७. | महान आज्ञापालनाचे भागीदार | : (पाळकांचे नेटवर्क) |
| ८. | प्रशिक्षण कार्यक्रम | : सेमिनार आणि रीट्रीटो |
| ९. | महासभा | |
| १०. | छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा | |
| ११. | शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय | : प्रकाशने |
| १२. | सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल | : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल |
| १३. | रवीवारी शब्बाथ शाळा | : सकाळी १०.३० आणि सायंकाळी३ वाजता-रविवारी (चेपॉक, वेलाचेरी, बालाजी नगर आणि संतोषपुरम) |
| **१४.** | **सकाळची उपासना** | **: रविवारी सकाळी ५.३० वाजता** |
| **१५.** | **सुरुवातीची उपासना** | **: रविवारी सकाळी ८.०० वाजता** |
| **१६.** | **तामिळ उपासना** | **: रविवारी सकाळी ८.३० वाजता** |
| **१७.** | **युवा सभा** | **: रविवारी दुपारी ११.०० वाजता** |
| **१८.** | **सहभाग भोजन** | **: रविवारी दुपारी १.०० वाजता** |
| **१९.** | **तेलगु उपासना** | **: सायंकाळी ५ वाजता - रविवारी** |
| **२०.** | **हिन्दी उपासना** | **: सायंकाळी ४ वाजता - रविवारी** |
| **२१.** | **तामिळ आणि इंग्रजी उपासना** | **: सायंकाळी ६ वाजता - रविवारी** |
| २२. | अभिप्रायाची वेळ | : सायंकाळी ७.३० वाजता - रविवारी |
| २३. | स्त्रियांची प्रार्थना | : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी |
| २४. | पुरुषांची प्रार्थना | : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी |
| २५. | शिष्यत्त्वाची सभा | : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी |
| २६. | गृह प्रार्थना सभा | : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी |
| २७. | विशेष प्रभु भोजन | : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी |
| २८. | सेवाकाची समालोचन सभा | : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार |
| २९. | पालकांची प्रार्थना | : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार |
| ३०. | रात्रभर प्रार्थना | : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शुक्रवार |
| ३१. | उपवास प्रार्थना | : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शनिवार |
| ३२. | पवित्र सहभागिता | : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत |
| ३३. | तरुण/तरुणी/लहान लेकरांसाठी प्रार्थना | : दररोज रात्रो १० वाजता (फोन द्वारा) |
| ३४. | कार्यालयीन स्टाफचे मनन | : सकाळी ९ वाजता - दररोज |
| ३५. | कार्यालय | : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून) |

## एको ऑफ हिज कॉल

### टपाल द्वारे धर्म शास्त्राचे अभ्यासक्रम

**केवळ भारतातील उमेदवारां करीता**

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुवार्तिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

अध्यक्ष - नहेम्या बाईबल कॉलेज
एको ऑफ हिज कॉल, पोस्ट बॉक्स नं. २९५७,
चिपॉक, चैन्नई - ६०० ००५
फोन : (०४४) २८५२ ८२८२, २८५२ ९२९३,
फोन : ९८४१० ७१८५२, ९५६६१ ३१८५८
E-mail: biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

**मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी**

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर ''**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**'' च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | |
|---|---|
| **Account Name** | **: ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | **: 1023 2923 805** |
| **Bank Name** | **: STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | **: TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | **: SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | **: SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

# माझ्या जीवनात त्याचे मार्गदर्शन आणि दैवी प्रावधान

## जे त्याला भितात त्यांची इच्छा तो पुरवील – स्तोत्र १४५:१९

१९८२ मध्ये चेन्नई (मद्रास) येथील चेपॉक येथे मंडळीची सेवा सुरू करण्यास प्रभू येशू ख्रिस्ताने मला कृपादृष्टी दिली. सुरुवातीपासूनच, मंडळीला आर्थिक अडचणींमुळे, तसेच परिसरातील ख्रिस्ती-विरोधी लोकांकडून होणारा विरोध आणि द्वेष यामुळे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित होण्याचे आव्हान सतत पेलावे लागले.

शेवटी, आम्ही आमच्या रविवारच्या उपासनेचे आयोजन एका घरातल्या लहान खोलीत करायचो, जिथे वायुवीजन नव्हते. हे घर आमच्या प्रिय भावाचे, श्री. जॉर्ज यांचे होते.

एका विशिष्ट उपासनेदरम्यान, प्रभूने अनपेक्षितपणे आणि सामर्थ्यानिशी माझ्या आत्म्याला या गोष्टीवर विश्वास ठेवण्यास उत्तेजित केले की, त्याच परिसरात तो आम्हांला स्वतःचे एक प्रशस्त इमारतीचे प्रावधान करून देईल. त्याने मला मंडळीला हे सांगण्यास आणि त्यांच्या प्रार्थनेच्या पाठिंब्याची विनंती करण्यास देखील मार्गदर्शन केले. मी प्रभूची आज्ञा पाळली आणि उपासने दरम्यान हे दर्शन सांगितले.

तथापि, ज्या लोकांनी माझे ऐकले त्यांनी उपहास आणि अविश्वासाने प्रतिसाद दिला.

- काहींनी त्यांच्या उपहासात्मक नजरेने माझी थट्टा केली.
- इतरांनी प्रश्न केला, आपल्या कमजोर आर्थिक परिस्थितीत मालमत्ता खरेदी करणे आपल्याला शक्य आहे का?
- काहींनी आध्यात्मिक दबाव वाढवत म्हटले, आमच्याकडे पैसे जरी असते तरी, इतक्या दाट लोकवस्तीच्या भागात विक्रीसाठी आपल्याला मालमत्ता कुठे मिळेल?
- काहींनी तर माझ्यावर टीका करीत विचारले, देवाच्या नावाने अशा अव्यवहार्य गोष्टी बोलणे एखाद्या देवाच्या माणसाला शोभते का?

या सर्व प्रतिक्रियांमुळे मी खूप गोंधळात आणि निराशेत पडलो. विश्वासाचे हे पाऊल पुढे टाकण्यात माझ्यासोबत उभा राहणारा एकही व्यक्ती मला सापडला नाही. सामान्य लोकांनी असा निष्कर्ष काढला की ख्रिस्ती प्रचारकांकडे अवास्तव आणि अस्वीकार्य कथा सांगण्याव्यतिरिक्त काहीही चांगले काम नाही. देवाचे दर्शन ओळखण्यात ते कमी पडले.

पण, तरीही मी निराश झालो नाही. त्याऐवजी, प्रभूने माझे सांत्वन केले आणि **आपल्या विश्वासाचा कर्ता आणि पूर्ण करणारा त्याच्यावर दृढपणे अवलंबून राहण्याची कृपा पुरवली.** (इब्री १२:२). त्याने त्याच्या वचनाद्वारे माझे हृदय बळकट केले: **''हे किड्या, याकोबा, आणि तुम्ही इस्राएलच्या मनुष्यांनो, भिऊ नका, यहोवा म्हणतो, मी तुझे साहाय्य करीन, आणि इस्राएलाचा पवित्र तुझा उद्धारक आहे. पाहा, मी तुला दाते असलेले नवे तीक्ष्ण मळण्याचे यंत्र असे केले आहे, तू पर्वत मळून त्याचे पीठ करशील, आणि डोंगर भूसांसारखे करशील.''**

दिवस सरले. देवाने सर्व लोकांसमोर माझा सन्मान केला आणि ज्या ठिकाणी त्याने मला दृष्टान्त दिला होता त्याच ठिकाणी त्याने त्याच्या सेवेसाठी एक अद्भुत जागा उपलब्ध करून दिली.

परंतु जेव्हा मला ती जागा सापडली, तेव्हा ती मालमत्ता खरेदी करण्यासाठी माझ्याकडे पैसे नव्हते, जसे लोकांनी त्याबद्दल आधीच म्हटले होते. मी ओळखीच्या विविध लोकांकडून मदत मागितली; परंतु मी आर्थिकदृष्ट्या फारच गरीब असल्याने कोणीही मदतीसाठी पुढे आले नाही. या निराशाजनक परिस्थितीत, सरकारने स्वतः मला मालमत्ता खरेदी करण्यासाठी वैयक्तिक इमारत आगाऊ रक्कम दिली, कारण मी त्यावेळी सरकारी सेवेत होतो. हे शक्य करण्यासाठी देवाने एक गैर-ख्रिस्ती मित्र, श्री. कन्नन आणि एक ख्रिस्ती भाऊ, श्री. एम. पी. जेया कुमार यांचा उपयोग केला.

येशू विश्वासयोग्य प्रभू आहे. येशू ख्रिस्त प्रत्येक समयी चांगला आहे, आणि प्रत्येक समयी येशू ख्रिस्त चांगला आहे! किती अद्भुत अशा देवाची आपण सेवा करतो! **''अहो, यहोवा चांगला आहे, याचा अनुभव घेऊन पाहा;.....''** - स्तोत्र ३४:८.

आज मी हा संदेश लिहित असतानाही, माझे आयुष्य अजूनही कठीण आणि आव्हानांनी भरलेले आहे. देवाने दिलेल्या अनेक सेवा पार पाडताना मी दररोज अडचणी आणि अगणित ओझ्यांनी दबून जातो - १६ भाषांमध्ये छापलेले **एको ऑफ हिज कॉलचे** दरमहा मासिक, ३ भाषांमध्ये **बायबलकोर कॉरस्पॉन्डन्स** आणि प्रशिक्षण अभ्यासक्रम, **नहेम्या बायबल कॉलेजेस,** दर रविवारी सात उपासना सेवा असलेली मुख्य मंडळी, **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूल** (ग्रामीण हायस्कूल), गॉस्पेल प्रिंटिंग प्रेस आणि त्यांच्याशी संबंधित सर्व प्रशासकीय जबाबदारी.

मला सेवाकार्य आणि प्रशासन या दोन्ही क्षेत्रात निर्विवादपणे वैयक्तिक संघर्ष, आव्हाने आणि अपयशांना तोंड द्यावे लागते. अनेक रात्री मला झोप येत नाही, आणि अनेक रात्री मला झोपावेसेच वाटत नाही. या सर्व कष्टांतून मी हे शिकलो आहे की, अंधकारमय अशा, दुष्टाचा दबाव असलेल्या आणि नैराश्येने भरलेल्या या जगात विश्वास ठेवण्यास खरोखरच योग्य आणि सदैव विश्वासू असा एकमेव प्रभू येशू ख्रिस्त हाच आहे. मी त्याच्या अढळ मार्गदर्शनाचा आणि दैवी प्रयोजनाचा वैयक्तिकरित्या अनुभव घेतलेला आहे.

**एका सुप्रसिद्ध उपासनेच्या गीतातील खालील ओळी माझ्या प्रवासाचे वर्णन करतात:**

***मार्गदर्शन कर, हे कृपाळू प्रकाशा, चोहोबाजूंनी घेरलेल्या अंधारात, तू माझे मार्गदर्शन कर!***

***रात्र काळोखी आहे, आणि मी घरापासून खूप दूर आहे; तू माझे मार्गदर्शन कर!***

***माझे पाय तूच स्थिर कर; पुढे काय आहे ते पाहण्याची मी मागणी करीत नाही.***

***दूरदृष्टी मला करायची नाही; मात्र एक पाऊल माझ्यासाठी पुरेसे आहे.***

माझे दैनंदिन जीवन परीक्षा आणि अडचणींनी भरलेले आहे, तरीही माझ्यापाशी एक आशीर्वादाने भरलेले आश्वासन आहे की,



जेव्हा मी या पृथ्वीवरील माझे काम पूर्ण करीन, तेव्हा मी माझ्या स्वर्गीय घरात प्रवेश करीन, माझा स्वामी येशू ख्रिस्ताला समोरासमोर भेटीन आणि त्या गौरवशाली क्षणी त्याला आलिंगन देईन आणि माझे सर्व पृथ्वीवरील अनुभव त्याच्यासोबत सामायिक करीन. मी आतुरतेने त्या दिवसाची वाट पाहत आहे. तो दिवस माझ्यासाठी खूप अद्वितीय असेल! तो दिवस माझ्यासाठी सर्वात आशीर्वादाचा असेल!

प्रिय मित्रा, ही आशा आणि तळमळ तुझ्याही मनात आहे का?

*************

(पान ६ वरून)

- देवाच्या राज्याविषयीचे आपले मनोबल वृद्धिंगत करा.
- तुमच्याकडे असलेल्या सर्व गोष्टींनी त्याचा आदर करा.

...तुम्हाला तुमच्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात देवाची अलौकिक कृपा आणि विजय दिसेल.

**......आणि दावीद जेथे जेथे जात असे तेथे तेथे यहोवा त्याला जय देत असे** - २ शमुवेल ८:६.



*तुमच्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात तुम्हाला देवाची अलौकिक कृपा आणि विजय दिसेल.*



*दावीद जेथे जेथे गेला तेथे तेथे प्रभूने त्याला जय दिला.*

तुम्ही जिथे जाल तिथे परमेश्वर तुम्हाला जय देतो हीच साक्ष २०२६ मध्ये तुमची सुद्धा असावी.

ज्या ठिकाणाने कधीकाळी भय निर्माण केले होते, तेच ठिकाण तुमच्या विश्वासाचे दृढ गड बनो.

**तुम्हांस विजयी नवीन वर्षाच्या शुभेच्छा!**




**देव तुम्हांस आशीर्वादित करो आणि तुमचे नवीन वर्ष विजयी जावो!**

*******

## सूचना

कृपया आमचे मोबाईल क्रमांक (+९१) ९८४१० ७१८५८, (+९१) ९८४१२७१८५८ (मुख्य क्रमांक) आपल्या मोबाईल फोनमध्ये जतन करून ठेवा.

**– संपादक**

Posted at "Egmore RMS Patrika Channel" RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## OUR BANK DETAILS:

### *1. Bank : State Bank of India*

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

### *2. Bank : ICICI Bank*

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

### *3. Bank : State Bank of India*

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

## OUR QR CODE:

ECHO OF HIS CALL

Scan to pay with any UPI app

State Bank of India

**Google Pay: 98410 71858**
**PaySal : SAM SELVA RAJ**

*****

E.mail : sam@echoofhiscall.org

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य, गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-     आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाउन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.org

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26
WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26
Date of Publication: Second week of every month
Date of Posting : 11th & 12th of every month
Posted at "Egmore RMS Patrika Channel"
on 12th JANUARY 2026.
If un-delivered please return to:
ECHO OF HIS CALL (MARATHI)
P.O. Box No. 2957,
Chepauk, Chennai - 600 005, INDIA.
Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766

*JESUS LOVES YOU!*

To

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**